# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे** -

(१) **पशुसंवर्धन मंत्री** : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे तेहतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, रामदास मसराम, संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात लग्नात हुंडा घेणे कायद्याने गुन्हा असणे, मात्र प्रत्येक गावात/ तांडयात आणि शहरांमध्ये लोक अजूनही हुंडा म्हणून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, दुचाकी- चारचाकी वाहने इत्यादी घेत असणे, त्यामुळे प्रत्येक मुलीच्या पालकांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी खुप मोठया प्रमाणावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कित्येकदा मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च मुलींच्या पालकांना करावा लागत असणे, या प्रथेमुळे मुलींच्या कित्येक पालकांनी आत्महत्या केल्याचीही उदाहरणे असणे, पालकांचे दु:ख पाहून कित्येक मुलीही आत्महत्या करण्याचा मार्ग निवडत असणे, त्यामुळे शासनाने हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी, जनजागृती करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (अ, ब, क, ड) इतर मागास प्रवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना राज्य शासनाच्या विविध नोकर भरती परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गाचे बरोबरीने परीक्षा शुल्क आकारणी होत असणे, उदाहरणार्थ खुल्या प्रवर्गासाठी एखाद्या परीक्षेचे शुल्क १००० रुपये असेल तर मागासवर्गीय प्रवर्गासाठी परीक्षा शुल्क ९०० रुपये असणे, खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्गाच्या परीक्षा शुल्कात केवळ १०० रुपयांचा फरक असणे, भरमसाठ परीक्षा शुल्कांमुळे उक्त उल्लेखित प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकर भरती अर्ज करताना आर्थिक अडचणी येत असणे,त्यामुळे खुल्या प्रवर्गाचे तुलनेत मागास वर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना परिक्षा शुल्क ५०% ने कमी होणे गरजेचे असणे, वाढीव परीक्षा शुल्कांमुळे मागास प्रवर्गातील बेरोजगार शासकीय नोकरी मिळविण्याच्या संधीपासून वंचित राहत असणे, यामुळे उक्त प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली असणे,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(३) श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. सुभाष देशमुख, संजय केळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात नगरपरिषदा, नगरपालिका, नगरपंचायती व महानगरपालिकांची लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची निवड झालेली असताना पुरेश्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ त्यांच्या मदतीला नसणे, त्यामुळे आगामी काळात सर्वच क्षेत्रातील विकास कामे विलंबाने होणार असणे, यास्तव राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती मधील नोकर भरतीचा तातडाने आढावा घेऊन सर्व रिक्त पदे भरण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, सदर रिक्त पदे भरत असताना स्थानिक बेरोजगार युवकांना या क्षेत्रात संधी देण्याबाबतचा सर्वंकष असा आराखडा तयार करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सन २००९ मध्ये स्थापना झालेल्या वसई विरार महानगरपालिकेने आतापर्यंत सी.सी.(C.C.) दिलेल्या जवळपास २००० इमारतींपैकी बहुतांश इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊनही जवळपास ९०% इमारतींना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) दिलेले नसणे, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत वसई विरार क्षेत्रात भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी अभय योजना लागू करण्याचे आदेश देण्यात येणे, मात्र अद्याप या आदेशांची अंमलबजावणी न होणे, इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र न घेणाऱ्या विकासकांच्या इतर मालमत्तांवर बोजा लावून त्यांचा नवीन प्रकल्प मंजूर केला जाणार नाही असे आश्वासन दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी

विधानसभा सभागृहात शासनाकडून दिलेले असणे, तसेच या विकासकांची "काळी यादी" तयार करून राज्यातील सर्व महानगरपालिकांना पाठविण्याचे निर्देश सन्माननीय तालिका अध्यक्षांकडून दिलेले असणे, मात्र अद्याप यावर महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही न होणे, जनतेची फसवणूक करणाऱ्या विकासकांना पाठिशी घालण्यासाठी मालमत्तांचा बाह्ययंत्रणा सेवा पुरवठादाराद्वारे सर्व्हे करण्यात येत असल्याचे कारण महानगरपालिकेने देणे, मुळातच ज्या इमारतींना महानगरपालिकेने स्वत: भोगवटा प्रमाणपत्र दिले आहेत ती इमारत पूर्ण झाली आहे काय, त्यातील बांधकामात अनियमितता आहे काय, हे तपासण्यासाठी बाह्ययंत्रणेची गरज काय, याचे उत्तर महानगरपालिकेने न देणे, परिणामी अजूनही या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू केली गेली नसल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) श्रीमती विद्या ठाकूर, श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील सिद्धार्थनगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प गेली १८ वर्षे रखडलेला असणे, गोरेगाव पश्चिमेतील म्हाडाच्या जमिनीवरील हा एक मोठा प्रकल्प असणे, विकासक काम अर्धवट सोडून गेल्यानंतर म्हाडाकडून हा प्रकल्प ताब्यात घेऊन पूर्ण केला जाणे, इमारती बांधून तयार असताना देखील अद्यापी घरांचा ताबा रहिवाशांना देण्यात आलेला नसणे, संस्था आणि म्हाडा यांच्यातील सुधारित विकास करारनामा झालेला नसणे, रहिवासी आणि म्हाडा यांच्यात करावयाचा वैयक्तिक करारनामा ( PAAA ) झालेला नसणे, इमारतीच्या निकृष्ट दर्जाबाबत तपासणी करण्याचे काम मा.उच्च न्यायालयाने वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था ( VJTI ) यांना दिलेले असणे, त्याबाबतचा अहवाल अजूनपर्यंत शासनास प्राप्त झालेला नसणे, सदनिकांचा ताबा मिळण्यास होत असलेला विलंब, म्हाडामार्फत या संपूर्ण प्रकरणात होत असलेली टाळाटाळ, तसेच म्हाडातर्फे रहिवाशांना मिळत असलेल्या मासिक भाड्यात न झालेली वाढ, यामुळे रहिवाशांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेला संताप व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(६) श्रीमती सना मलिक, श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने शासनाने सुरु केलेली शिवभोजन थाळी योजना ही राज्यातील गरीब, मजूर, रुग्ण, विद्यार्थी, स्थलांतरित कामगार तसेच सर्वसामान्य गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली लोककल्याणकारी योजना असणे,

या योजनेमुळे राज्यातील लाखो नागरिकांना प्रतिदिन स्वस्त व पौष्टिक भोजन उपलब्ध होत असून हजारो महिला बचत गटांना तसेच युवकांना मोठया प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध झालेली असणे, या योजनेचा २० लाख गरजवंत नागरिक लाभ घेत असून राज्यामध्ये किमान १८०० शिवभोजन केंद्रे असणे, या योजनेच्या केंद्रांमुळे ९००० कुटूंबांचा उदरनिर्वाह होत असणे, शिवभोजन योजनेच्या अनुदानाचे सुमारे २०० कोटी रुपये शासनाकडून थकविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीपासून राज्यातील अनेक शिवभोजन केंद्रचालकांना देय असलेले अनुदान प्राप्त न झाल्यामुळे या केंद्राची आर्थिक घडी विस्कटली असून अनेक केंद्रे बंद झालेली असणे, तर उर्वरित सुरु असलेली केंद्र केव्हाही बंद पडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, परिणामी गरीब आणि गरजू नागरिकांना स्वस्त व पौष्टिक भोजन उपलब्ध होत नसल्यामुळे राज्यातील गरीबांना अन्नापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, तसेच या योजनेची केंद्रे बंद पडल्यास हजारो लोकांचा रोजगार बंद होऊन दैनंदिन उपजिवीका तसेच घरातील वृध्दांच्या आरोग्याचा खर्च, लहान मुलांचे शिक्षण आणि उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे उपासमारीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता, सदरहू बाब लक्षात घेता शासनाने शिवभोजन योजना थाळीचे थकीत अनुदान संबंधित केंद्र चालकांना देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(७) श्रीमती रंजना जाधव, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील शिवना टाकळी मध्यम प्रकल्पासाठी गोदावरी पाटबंधारे महामंडळांतर्गत दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी कन्नड व वैजापूर तालुक्यातील उजव्या मुख्य वितरिका तसेच Closed Pipe Distribution Network आणि संलग्न कामांसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असणे व कार्यारंभ आदेशाची प्रक्रिया सुरू असल्याचे निदर्शनास येणे, सदर निविदेतील अटी जाणीवपूर्वक जाचक ठेवून अधीक्षक अभियंता यांनी विशिष्ट कंत्राटदारांना लाभ व्हावा यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केल्याचे दिसून येणे, निवड झालेल्या कंत्राटदाराने तीन संस्थांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे सहभाग घेतलेला असणे, त्यातील “अभिराज कन्स्ट्रक्शन” ही संस्था कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून काळ्या यादीत असणे, ही बाब माहीत असूनही Joint Venture च्या माध्यमातून पात्र ठरविण्यात आलेले असणे, सदरहू बाब शासनाच्या अटींचे उल्लंघन ठरणे, तसेच संबंधित कंत्राटदाराची गांधेली येथील गट क्र. १६१ व १६२ जमीन अधिक्षक अभियंता यांचा अत्यंत जवळचा नातेवाईक (भाचा) यांच्या नावावर हस्तांतरित झालेली असणे व जमीन स्वरूपात लाच स्वीकारल्याची शक्यता निर्माण होणे, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री. हारुन खान, हिरामण खोसकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्हयातील देवळाली विधानसभा मतदार क्षेत्रातून शासनाचा प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पाचा मार्ग नियोजित असून त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकल्प विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी देवळाली (जि.नाशिक) मधील शेतकऱ्यांच्या जमिनी या त्यांच्या कुटुंबांचा आधारस्तंभ असून त्यांनी पिढयानपिढया जोपासलेल्या असणे, त्यामुळे त्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, त्याचप्रमाणे सदर रिंगरोडसाठी, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष पॅकेज देण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केलेली असणे, तसेच सदर बाहय रिंगरोड हा वनजमीन वा शासकीय भूखंड क्षेत्रातून प्रस्तावित करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, त्याचबरोबर बाधित घरे, विहिरी, व्यवसाय इत्यादी वाचविण्यासाठी अलाइनमेंट बदल करणे, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष मोबदला पॅकेज देणे वा पाचपट वाढवून अधिकचा मोबदला व पुनर्वसन योजना तसेच अरिंगळे मळा परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवून प्रकल्प राबविण्यात यावा अशा मागण्या तेथील शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या असणे, परिणामी सदर प्रकल्प राबविला गेल्यास शेतकऱ्यांचा होणारा उद्रेक व शासनाप्रती निर्माण होणारा असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : मुख्यमंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियम २४६(१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**सहा : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस).**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**
**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६**

**आठ : मा.अध्यक्षांचा प्रस्ताव :-**

"दि.०८ मार्च, २०२६ हा दिवस "आंतरराष्ट्रीय महिला दिन" म्हणून जागतिक स्तरावर साजरा करण्यात येणे, नारी शक्तीच्या प्रेरणास्थानी असलेल्या मा.आई जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या पुण्यभूमीत महिला

सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध कल्याणकारी योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला वर्गात आत्मविश्वास व आत्मनिर्भरता निर्माण करणे, ४ थ्या महिला धोरणामध्ये विहित शाश्वत विकास व महिला सक्षमीकरण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने प्रत्येक विभागासाठी कृती कार्यक्रम व त्यासाठी अपेक्षित विकास मोजमापाचे निर्देशांक निश्चित केलेले असणे, त्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून शासनाने आरोग्य, कायदा, बचतगट, सहकारी संस्था, महिला कामगार, महिला ऊसतोड कामगार, अत्याचार पीडीत महिला यांचेसाठी अनेक कार्यक्रम घेण्याची आवश्यकता, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूद करणे, असंघटीत कामगार विशेषत: महिला कामगारांसाठी विशेष कार्यक्रमांची असलेली आवश्यकता, शासनाने शेतकरी व शेतमजूर महिलांसाठी तसेच महिला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना, महाराष्ट्रात महिलांच्या सर्वसमावेशक आर्थिक सबलीकरणासाठी महिला बचत गट व महिला सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे, शहरी उपजिविका अभियानांद्वारे महिलांमधील कौशल्य व उद्योजकता वृध्दिंगत करणे व त्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, आदिवासी व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्रांमध्ये महिला वन कामगार, वनोत्पादकांचे संकलन, वननिवासी महिला निसर्ग पर्यटन तसेच वन व पर्यावरण संवर्धनात महिलांचा प्रभावी सहभाग व शाश्वत विकासाठी कृती कार्यक्रम राबविणे, किशोरवयीन मुलींना आरोग्य, पोषण, सुरक्षितता व स्वच्छतेबाबतचे प्रशिक्षण देणे, महिलांमध्ये डिजिटल साक्षरता तसेच ई-गव्हर्नन्स प्रणालीबाबत जागरुकता निर्माण करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे क्षमतावर्धन करुन महिलांमधील नेतृत्वगुणांचा विकास करणे, लिंगसापेक्ष अर्थसंकल्पिय तरतूदींबाबत जागरुकता निर्माण करणे, स्त्री-पुरुष समानतेप्रती अर्थधोरण राबविणे, महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी कायदे तयार करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, महिलांमध्ये डिजीटल व्यवहार व सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करुन डिजीटल प्रणालीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देणे, कौटुंबिक हिंसाचार व अत्याचारग्रस्त महिलांचे सक्षमीकरण, समुपदेशन व पुनर्वसन करणे, महिलांसाठी दुग्धव्यवसाय पतसंस्था, हस्तकला, स्वयंसहायता गट, महिला बचत गट, महिलांसाठी अनुरुप शहरी कौशल्य केंद्रे, महिला उद्योजकांसाठी सार्वजनिक-खाजगी-भागिदारी उपलब्ध करुन देणे, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, महिला कामगार यांचे सक्षमीकरण करणे, महिला विकासाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने विभागनिहाय कृती कार्यक्रम जाहिर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षा विचारात घेता यासंदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना . "

नऊ : (शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri **२०२६'** ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : (शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग

पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : (शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली

बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत पूर्ण करुन आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता, राज्यात विशेषत: ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात काँक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ८ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.